MHYA010006352023

दाखल तारीख : १६/०३/२०२३
नोंदणी तारीख : १७/०३/२०२३
निकाल तारीख : १५/०४/२०२६
कालावधी : वर्ष महीने दिवस
०३ ०० ३०

**भाग -अ**

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांचे न्यायालयात.**
(पिठासीन अधिकारी : पी.एस.इंगळे )

**सत्र खटला क्रमांक ४३/२०२३** **निशाणी क्रमांक - ५६**

| न्यायनिर्णय दिनांक : १५/०४/२०२६ | |
|---|---|
| **फिर्यादी पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलीस स्टेशन बाभुळगाव, ता. बाभुळगाव,<br>जि. यवतमाळ. |
| **फिर्यादी पक्षातर्फे अभियोक्ता** | श्री. एन. एन. पांडे |
| **- विरूद्ध -** | |
| **आरोपी** | **शेख राहील शेख युनूस,**<br>वय – २१ वर्षे, धंदा –<br>रा.धोंगडे बाब लेआउट, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | ॲड. श्री. इम्रान देशमुख |

**भाग -ब**
**[ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १०/१२/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १०/१२/२०२२ |
| फिर्याद/दोषारोपपत्र दिनांक | १०/०३/२०२३ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ३०/०९/२०२४ |
| दोषारोप पुर्वीच्या पुरावा दिनांक | निरंक |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | १५/०४/२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | ..... |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी फौ.प्र.सं.क. ४२८नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेख राहील शेख युनूस, | १४/१२/२२ | ०३/०१/२३ | भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, १८६, ३५३, ५०६, १८९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे प्रमाणे होणारे अपराध | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

**(दिनांक १५/०४/२०२६ रोजी घोषित)**

या प्रकरणामध्ये आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, १८६, ३५३, ५०६, १८९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधांबाबतचा खटला चालविण्यात आला.

२. फिर्यादीचे प्रकरण थोडक्यात असे की घटना दिनांक १०/१२/२०२२ रोजी सकाळी ११.३५ वाजताच्या सुमाराम विरखेड फाटा, ता. बाभुळगाव येथे घडली. त्यावेळी, तक्रारकर्ते विठ्ठल सिताराम कुमरे हे रेती व गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुकीवर कारवाई करण्याच्या उद्देशाने मौजा वाटखेड बु. (काशी घाट) मध्ये पाहणी

करण्याकरीता गेले असता, सदर रेतीघाटात दोन वाहन (ट्रॅक्टर) अवैधरीत्या रेती वाहनात भरुन रेती घाटात उभे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी शहानिशा केली असता, संबंधीत एका ट्रॅक्टर वाहनाचे मालक शेख छोटु शेख अशपाक व दुस-या ट्रॅक्टर वाहनाचे मालक शेख राहील शेख युनुस असल्याचे समजले. त्यामुळे दोन्ही वाहनाचा पंचनामा करुन सदरील दोन्ही ट्रॅक्टर तहसिल कार्यालय, बाभुळगाव येथे जमा करण्याच्या उद्देशाने मौजा विरखेड मार्गे बाभूळगाव येथे आणण्याकरीता रस्त्याने जात असताना, मौजा विरखेड फाटा येथे वाहन मालक शेख राहील शेख युनुस याने त्यांचे शासकीय वाहन महींद्रा बोलेरो एम.एच-२९- एम.९६२६ हे बळजबरीने अडवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच शेख राहिल हा तक्रारकर्ते विठ्ठल कुमरे यांच्या अंगावर धावून आला व आरोपीने घातलेल्या पैन्ट मधील पायाच्या भागात लपवुन ठेवलेले शस्त्र (चाकु) बाहेर काढला व ''तुमको इधर रहना नही है क्या? तुम्हारा भी परीवार है तुम्हारे भी बालबच्चे है, मेरी गाडी छोड दो, वरना मैं तुमको देख लुंगा'', असे म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली. नंतर शेख राहील शेख युनुस याने त्याचे मालकीचा निळ्या रंगाचा सोनालीका कंपणीचा ट्रॅक्टर वर (विनाक्रमांक) हजर असलेला वाहन चालक नामे प्रविण लक्ष्मण परचाके याला तो ट्रक्टर पळविण्याकरीता सांगीतले. त्याला समजावुन सांगीतल्या नंतरही तो संबंधीत ट्रॅक्टर चालकाला तो ट्रॅक्टर पळविण्याकरीता सांगत होता. सदर घटनेच्या वेळी त्यांच्यासोबत वर नमूद शासकीय वाहनाचे वाहन चालक शेख हफीज शेख अब्बास व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी गोपाल विलासराव कावलकर हे सुद्धा होते.

३. सबब, तक्रारकर्ते विठठल सिताराम कुमरे यांनी आरोपीच्या विरोधात संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये कैफियत दिली. कैफियत प्राप्त झाल्यानंतर, पोलीसांनी घटनेचा तपास केला. तसेच साक्षीदारांची बयाने नोंदविली. तपासाअंती, पोलीसांनी आरोपीच्या विरोधात दोषारोपपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. माझ्या विद्वान पूर्वाधिका-यांनी आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, १८६, ३५३, ५०६, १८९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम

४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधाबाबतचे आरोप निश्चित केले व ते आरोपीला वाचुन व समजावून सांगण्यात आले. मात्र, आरोपीने ते कबुल नसल्याचे सांगून खटला चालविण्याची तयारी दर्शवली.

५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविण्यात आलेल्या आरोपीच्या बयाणावरून, आरोपींचा बचाव संपूर्ण नकाराचा असल्याचे स्पष्ट होते.

६. फिर्यादीतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. एन. पांडे व आरोपीतर्फे विद्वान वकील ॲड. श्री. इम्रान देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणाचे अवलोकन केले.

७. प्रकरणाचे अवलोकन केले व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालील प्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादीने असे सिध्द केले काय की दिनांक १०/१२/२०२२ रोजी सकाळी ११.३५ वाजताच्या सुमारास विरखेड फाटा, ता. बाभुळगाव येथे तक्रारकर्ते विठ्ठल सीताराम कुमरे हे रस्त्याने जात असतांना त्यांना आरोपीने रस्त्यावरुन जाण्यास अडविले व त्याव्दारे आरोपीने तक्रारकर्ते विठ्ठल सीताराम कुमरे यांची अडवणूक केली व त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३४१ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| २. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपीने स्वखुशीने तक्रारकर्ते विठ्ठल सीताराम कुमरे या लोकसेवकाला त्याचे सार्वजनिक कार्य पार पाडण्यापासून स्वेच्छेने अडथळा आणला व त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम १८६ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ३. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, | |

| | | |
|---|---|---|
| | वेळी व स्थळी, आरोपीने विठ्ठल सीताराम कुमरे हे लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य बजावत असतांना त्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर हल्ला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला व त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३५३ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ४. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपीने तक्रारकर्ते विठ्ठल सिताराम कुमरे यांना जिवे मारण्याची धमकी देवून त्याव्दारे आरोपीने,फौजदारी पात्र धाक दपटशहाचा अपराध भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह वाचीत कलम ३४ प्रमाणे केला ? | ... नाही |
| ५. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपीने तक्रारकर्ते विठ्ठल सिताराम कुमरे यांच्या मुलांना ईजा करण्याची धमकी देवून त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम १८९ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ६. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपीने, सार्वजनिक रस्त्यावर शस्त्र कायद्याचे कलम ४ अन्वये शस्त्र न बाळगण्याची केंद्र सरकारची अधिसुचना अस्तित्वात असतांना सुध्दा आरोपीने स्वतः जवळ विनापरवाना वर उल्लेखीत चाकू बाळगुन शस्त्र कायद्याचे कलम २५ (1-B) (b) अन्वये होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ७. | काय आदेश ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात आले. |

## -: <u>निष्कर्षांची कारणे</u> :-

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ६ च्या बाबत</u>** :-

८. या प्रकरणातील वस्तुस्थितीचा आणि साक्षीदारांनी दिलेल्या पुराव्याचा विचार करता तसेच पुनरावृत्ती टाळण्याकरीता, मी मुद्दा क्रमांक १ ते ६ वर एकत्रीरित्या चर्चा करीत आहे.

९. सचिन रामकृष्ण मदारे (फि.सा.क्र.१) हे घटनास्थळ पंचनाम्यावरील तसेच चाकू जप्ती पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगितले की पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व त्यातील मजकूर बरोबर आहे. मात्र सचिन (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगितले की दुसरा पंच कोण होता हे त्यांना माहिती नाही तसेच <u>त्यांच्यासमोर जप्ती झाली नाही</u>. त्यांच्या या पुराव्याचा विचार करता असे स्पष्ट होते की सचिन (फि.सा.क्र.१) यांच्यासमोर काहीही जप्त करण्यात आलेले नाही. तसेच सचिन (फि.सा.क्र.१) यांना त्यांच्या सोबत कथित पणे असलेला दुसरा पंच कोण आहे हे माहीत नाही. अशा परिस्थितीमध्ये, सचिन (फि.सा.क्र.१) यांच्या पुराव्याद्वारे असे, माफक संशयापलीकडे, सिद्ध होत नाही की पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तसेच चाकू जप्त केल्याबाबतचा जप्ती पंचनामा तयार केला होता. सबब सचिन (फि.सा.क्र.१) यांचा पुरावा शंका निर्माण करणारा असून त्यांचा पुरावा फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा नाही.

१०. विठ्ठल सिताराम कुमरे (फि.सा.क्र.२) हे तक्रारकर्ते तसेच तहसीलदार असून त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की शेख हफिज शेख अब्बास (फि.सा.क्र.४) व महसूल सहाय्यक गोपाल कावलकर (फि.सा.क्र.३) यांच्यासोबत त्यांनी काशी घाट येथे पाहणी केली असता, पात्रामध्ये दोन ट्रॅक्टर अवैध रेतीने भरलेले आढळून आले व ते ट्रॅक्टर पंचनाम्यानंतर शेख छोटू शेख अशपाक व शेख राहील शेख युनूस यांचे असल्याचे त्यांना आढळून आले. विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान पुढे असे सांगितले की वीरखेड फाट्यावर आरोपी शेख राहील शेख युनूस यांनी त्याचे वाहन त्यांच्या शासकीय वाहनाच्या समोर बळजबरीने लावले आणि त्याने त्याच्या पॅन्टच्या पायाच्या भागातून चाकू काढून त्यांना धमकी दिली. मात्र विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की <u>जो व्यक्ती न्यायालयामध्ये हजर आहे तो आरोपी शेख राहील शेख युनूस **नाही**</u>.

११. थोडक्यात, विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांच्या उपरोक्त पुराव्याद्वारे असे कबूल केले की न्यायालयामध्ये हजर असलेला आरोपी शेख राहील शेख युनूस नाही, म्हणजे न्यायालय मध्ये उपस्थित असलेल्या आरोपीच्या विरोधात विठ्ठल (फि.सा.क्र.१) यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये, आरोपीच्या विरोधात असणाऱ्या उपरोक्त अपराधांचे आरोप, विठ्ठल (फि.सा.क्र.१) यांच्या पुराव्याद्वारे माफक संशयापलीकडे, सिद्ध होत नाही.

१२. याशिवाय, गोपाळ (फि.सा.क्र.३) या प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की कलम १६४ अंतर्गत त्यांचे बयान न्यायदंडाधिकारी यांनी नोंदवले होते व त्या बयानामध्ये एक ट्रॅक्टर शेख छोटू शेख अशपाक यांचा व दुसरा ट्रॅक्टर शेख राहील शेख युनूस यांचा असल्याचे समजले ही बाब नमूद नाही. गोपाल (फि.सा.क्र.३) यांच्या कलम १६४ अंतर्गत न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग यांनी नोंदवलेल्या बयानाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की त्यांनी त्यांच्या बयानांमध्ये (निशाणी क्रमांक ३४) आरोपी शेख राहील शेख युनूस चे नाव कुठेही सांगितलेले नसून त्यांनी त्यांच्या बयानामध्ये शेख राहीम शेख युनूस यांचे नाव सांगितलेले आहे. सबब, आरोपी शेख राहील शेख युनूस च्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाबाबत शंका निर्माण होते.

१३. तसेच शेख हफिज (फि.सा.क्र.४) या प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे की ते तहसीलदार श्री कुमरे व गोपाळ कावलकर यांच्यासोबत काशी घाटावर गेले असता, तेथे त्यांना दोन ट्रॅक्टर व त्यामध्ये अवैध रेती असल्याची दिसले व त्यापैकी एक ट्रॅक्टर शेख छोटू व दुसरे ट्रॅक्टर शेख राहील शेख युनूस यांचे होते. शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सुद्धा सांगितले की वीरखेड फाट्यावर शेख राहील शेख युनूस यांनी त्याचे वाहन त्यांच्या वाहनासमोर उभे केले व त्यानंतर शेख राहील शेख युनूस हा श्री कुमरे यांच्या जवळ आला व त्याने त्याच्या पॅन्टच्या खालून एक चाकू काढला व त्यांनी तहसीलदार साहेबांना धमकी दिली.

१४. मात्र, शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की त्यांचे बयान बाभुळगाव येथील न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर झाले होते व ते बयान त्यावेळेस च्या न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग बाभुळगाव यांनी त्यांना वाचून दाखवले होते व ते बरोबर असल्याचे त्यांनी मान्य केले. शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सुद्धा कबूल केले की कलम १६४ च्या बयानामध्ये (निशाणी क्रमांक ४६) शेख राहील शेख युनूस हे नाव नमूद केलेले नाही. थोडक्यात, शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी सुद्धा गोपाळ (फि.सा.क्र.३) यांच्या प्रमाणेच त्यांच्या कलम १६४ च्या बयानामध्ये आरोपीचे नाव शेख राहील हे सांगितलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये तसेच विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांच्या उपरोक्त पुराव्याद्वारे आरोपी शेख राहील ची ओळख, माफक संशयापलीकडे, सिध्द होत नाही. सबब, आरोपीच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाबाबत शंका निर्माण होते.

१५. शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सुद्धा सांगितले की गोपाळ कावलकर (फि.सा.क्र.३) यांनी पंचनामा तयार केला. मात्र, शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी पंचनाम्याबाबत दिलेला पुरावा पुरावा शंका निर्माण करणारा आहे, कारण रेती जप्तीबाबत विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांनी पंचनामा (निशाणी क्रमांक २६) केल्याचे स्पष्ट होते. यात शंका नाही की फिर्यादीची असे प्रकरण आहे की कथित घटनेच्या वेळी तक्रारकर्ते विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांच्यासोबत शेख हफिज (फि.सा.क्र.४) आणि गोपाळ (फि.सा.क्र.३) हे होते. मात्र, तरीसुद्धा शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुरावा दरम्यान असे सांगितले की पंचनामा गोपाळ (फि.सा.क्र.३) यांनी तयार केला. वास्तविक, पंचनामा (निशाणी क्रमांक २६) चे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की तो पंचनामा विठ्ठल (फि.सा.क्र.२) यांनी तयार केलेला असून त्यावर गोपाळ (फि.सा.क्र.३) यांची सही पंच म्हणून आहे. असे असतांनाही, शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांनी तो पंचनामा गोपाळ (फि.सा.क्र.३) यांनी केल्याचे सांगितले. सबब, शेख हफिज (फि.सा.क्र.४) यांच्या पुराव्याबाबत तसेच फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण होते व

अशा शंका निर्माण करणाऱ्या पुराव्याद्वारे आरोपीच्या विरोधात असलेल्या अपराधांचे आवश्यक घटक फिर्यादीने, माफक संशयापलीकडे, सिद्ध होत नाही.

१६. रवींद्र (फि.सा.क्र.५) हे तपास अधिकारी असून त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगितले की तपासा दरम्यान त्यांनी आरोपीकडून चाकू जप्त केला व त्याबाबत जप्ती पंचनामा तयार केला तसेच कलम १६४ अंतर्गत बयान नोंदविण्याबाबतची पत्रे त्यांनी न्यायदंडाधिकाऱ्यांना दिली होती. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान पुढे असे सांगितले की आरोपीच्या विरोधात त्यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

१७. मात्र, रवींद्र (फि.सा.क्र.५) यांनी आरोपीकडून कथित पणे चाकू जप्त केल्याबाबतचा पुरावा पुष्टी विरहित आहे, कारण जप्ती पंचनाम्यावरील पंच सचिन (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुरावा दरम्यान असे सांगितले की त्यांच्यासमोर जप्ती झाली नाही. उलटपक्षी, सचिन (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की त्यांच्या समक्ष पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, मात्र दुसरा पंच कोण होता हे त्यांना माहिती नाही. सबब, सचिन (फि.सा.क्र.१) यांच्या उपरोक्त पुराव्याद्वारे असे सिद्ध होत नाही की त्यांच्या समक्ष रवींद्र (फि.सा.क्र.५) यांनी जप्ती पंचनामा तयार केला. परिणामतः, रविंद्र (फि.सा.क्र.५) यांनी त्याबाबत दिलेला पुरावा विश्वासार्ह नाही.

१८. याशिवाय, रविंद्र (फि.सा.क्र.५) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान कुठेही असे सांगीतले नाही की घटनेच्या वेळी शस्त्र न बाळगण्याबाबत शस्त्र कायद्यांतर्गतचे परिपत्रक किंवा अधिसूचना निर्गमीत करण्यात आलेली होती व तसे परिपत्रक अथवा अधिसूचना घटनेच्या वेळी अस्तित्वात होती. सबब, शस्त्र न बाळगण्याबाबत शस्त्र कायद्यांतर्गतचे परिपत्रक किंवा अधिसूचना, घटनेच्या वेळी अस्तीत्वात असल्याची बाब सुध्दा फिर्यादीतर्फे सिध्द करण्यात आलेली नाही. या सर्व बाबी, फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणा-या आहेत.

१९. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी पुरसिस (निशाणी क्रमांक ५३) दाखल करुन त्याव्दारे फिर्यादीच्या पुराव्याची बाजू बंद केली. उपरोक्त सर्व बाबींचा तसेच प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा एकत्रीत परिणाम (cumulative effect) असा आहे की फिर्यादीने आरोपीच्या विरोधात असणा-या सर्व आरोपांचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ६ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक ७ च्या बाबत** :—

२०. प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा विचार करता, मी अगोदरच असे ठरविले आहे की फिर्यादीने आरोपीच्या विरोधात असलेले आरोप, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाहीत. सबब, मी आरोपीला संशयाचा फायदा देत आहे. म्हणून आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की पोलीसांनी एक चाकू जप्त केल्याचे त्यात नमूद केलेले आहे. जप्त मुद्देमाल कोणीही मागीतलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये, जप्त शस्त्र म्हणजे एक चाकू, अपिल कालावधीनंतर, जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे नियमानूसार विल्हेवाटीसाठी पाठविण्यास पात्र आहे. परिणामतः, मुद्दा क्र. ७ चे उत्तरार्थ, मी खालील आदेश पारीत करीत आहेः-

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपीला भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, १८६, ३५३, ५०६, १८९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधांच्या आरोपातून, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये, दोषमुक्त करण्यात आले. |
| २. | जप्त शस्त्र म्हणजे एक चाकू, अपिल कालावधीनंतर, जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे नियमानूसार विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावा. |
| ३. | आरोपीचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात यावी. |

| | |
|---|---|
| ४. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे पुर्तता करावी. |

दिनांक - १५ /०४/२०२६

PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE

Digitally signed by PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Date: 2026.04.15 18:24:17 +0530

(पी. एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

## भाग -क

**[ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| फि.सा.क्र.१ | सचिन रामकष्ण मदारे (नि.क्र.१९) | घटनास्थळ पंच |
| फि.सा.क्र.२ | विठ्ठल सिमाराम कुमरे (नि.क्र.२१) | तक्रारकर्ते व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि. सा.क्र.३ | गोपाल विलासराव कावलकर (नि.क्र.३३) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि. सा.क्र.४ | शेख हफीज शेख अब्बास (नि.क्र.४५) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि. सा.क्र.५ | रविंद्र तबाजी जेधे (नि.क्र.४७) | तपासी अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | २२ | फिर्यादी |
| ३. | २३ | प्रथम वर्दी अहवाल |
| ४. | २४ | पोलीसांकडून प्राप्त झालेले पत्र |
| ५. | २५ | पोलीसांना दिलेले पत्र |
| ६. | २६ | पंचनाम्याची सत्यप्रत |
| ७. | २७ | नोटिसची सत्यप्रत |
| ८. | २८ | आदेशाची प्रत |

| | | |
|---|---|---|
| ९. | २९ | उपविभागीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रत |
| १०. | आर्टीकल अ | आरोपीकडून बंधपत्र घेवून वाहन सोडण्यात आले त्याची छायांकित प्रत |
| ११. | आर्टीकल ब | दंडाची रक्क्म भरल्याच्या चलानची छायांकित प्रत |
| १२. | ३० | हस्तांतरण प्रमाणपत्राची सत्यप्रत |
| १३. | ३१ | कार्यमुक्त व पदभार सोपवण्याबाबतच्या आदेशाची सत्यप्रत |
| १४. | ३२ | कर्तव्यावर हजर असणा-या कर्मचा-यांचे प्रमाणपत्र |
| १५ | आर्टीकल क | चाकू |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल :**

| अनुक्रमांक | मुददेमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | चाकू | निरंक |

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Ad-hoc District Judge-1,<br>Yavatmal |
| Date of Signature of Presiding Officer | 15/04/2026 |
| Date of Judgment Uploaded | 15/04/2026 |

DIPALI SOMESHWAR KOLHE

Digitally signed by DIPALI SOMESHWAR KOLHE
Date: 2026.04.15 18:25:22 +0530

दिनांक - १५/०४/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी-१, यवतमाळ.
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, यवतमाळ.